## प्रीतीगीत

अंतरात उमटले, अबोलीचे शब्द आज |
अकल्पित सुरांनाही मूक भावनांचा साज ||

थंडावल्या डोहामध्ये, कसे उठले तरंग ?
अनाम या वाटेवर, मज करी कोण संग ?

माझ्या मनीचा गं मला, न च लागे काही ठाव,
त्याला समजेल का गं माझ्या अंतरीचा भाव ?

शुष्क जीवनात अशा, भरू लागले रंग,
कुठल्याशा धुंदीत मी होऊ लागले दंग ?

वाळवंटी निर्जन या, दिसे मृगजळ जसा |
वठलेल्या वृक्षावर, कोवळ्या कोंबाचा ठसा ||

नव्या वाटा, नवी गावे - नवी ओढ अनुभवे,
अवघा आसमंत आज, गात जाई गीत नवे ||

वेड कसे हे लागले, कळले ना तुला-मला,,
गंध प्रीतीच्या फुलांचा, कसा भारावत जीव गेला ||

क्षण कोणता असा हा, मज भुलवून गेला ?
क्षण कोणता असा हा, तुज गुंतवून गेला ?

थोडे तुझे- थोडे माझे, स्वर आले हे जुळून,
जीवनाच्या पुष्करणीचे, फुल आले उमलून ||

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**